REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 10 | JULY - 2018

# लीळा चरित्रातील साहित्यिक स्त्रिया

प्रा. डॉ. कल्पना मेहरे
मराठी विभाग प्रमुख , नारायणराव राणा महाविद्यालय , बडनेरा (रेल्वे) जि. अमरावती.



श्री चक्रधरांनी बाराव्या शतकात महानुभाव पंथाची स्थापना केली. देवगिरीला यादव राजाची राजवट होती. यादवराजा हा वैदिक धर्माचा पुरस्कर्ता होता. सामाजात उच्चनिचतेचे प्रस्थ फार मोठया प्रमाणात वाढले होते. जनसामान्याकरीता शिक्षणाची कवाडे बंद होती. संस्कृत भाषेत ज्ञान बंदिस्त होते. अज्ञानामुळे समाज व्रतवैकल्य, कर्मकांड तसेच अनेक क्षुद्र देवतांच्या उपासनेत गुरफटलेला होता. स्त्री—शुद्रांना धर्माचा व ज्ञानार्जनाचा अधिकार नव्हता.स्त्रियांचे बालविवाह होत. स्त्रिया सती, केशवपन, वैधव्य, हुंडा या दुष्ट रुढींना बळी पडल्या होत्या. यामुळे सर्व सामान्यांचे जीवन अतिशय कष्टप्रद झाले होते. अशा स्थितीत श्री चक्रधरांनी महानुभव पंथाच्या माध्यामातून बहुजनांना हितकर असे विचार समाजात रूजवून सर्वसामान्य समाजास नवसंजीवनी दिली.

महानुभाव पंथाने आपले तत्त्वज्ञान मराठी भाषेतून विशद केले. विद्ववानांपासून सामान्यांपर्यंत ब्राम्हणांपासून शूद्रापर्यंत सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेतून लिहावे असा त्यांचा दंडक होता. स्त्री आणि पुरुष यामध्ये त्यांनी कधीच भेदाभेद केला नाही.स्त्रियांना समान अधिकार देणारा हा महाराष्ट्रातील पहिलाच संप्रदाय आहे. त्यामुळे अनेक स्त्रिया या पंथात समाविष्ट झाल्या यामध्ये प्रामुख्यान अनेक विधवा स्त्रिया होत्या. स्त्रियांमध्ये अजोड असे कार्य करण्याची क्षमता असूनही समाजाने त्यांच्याकडे लक्ष दिले नाही. त्या स्त्रियांना श्रीचक्रधरांनी पंथात मानाचे स्थान दिले. सन्मानाची वागणूक दिली.

ज्या काळात लेखन,वाचन इ. ज्ञानाच्या कक्षा स्त्रियांकरीता रूढीपरंपरेच्या कडिकुलूपात बंधिस्त होत्या. त्याकाळात महानुभावकालीन स्त्रियांनी लेखन केले. त्यांच्या माध्यमातून निर्माण झालेल्या वाङ्मयाने मराठी साहित्य समृध्द झाले. एवढेच नव्हे तर, आद्य मराठी कवयित्रीचा मानही महानुभाव पंथांच्या महदाईसा या विदुषीने पटकावला. महदाईसाप्रमाणेच इतर स्त्रियांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली. महदाईसा ही चर्चक व जिज्ञासूवृत्तीची होती. श्रीचक्रधरांनी महदाईसेच्या प्रश्नाच्या निमित्ताने श्रीकृष्णाच्या अनेक लीळांवर प्रकाश टाकला आहे. ही श्रीचक्रधर व श्रीगुंडमराउळ यांच्या चरणी लीन होती. तेराव्या शतकातील श्रीगोविंदप्रभूच्या 'विवाह स्विकारु' हया लीळेच्या प्रसंगी गायिलेले 'धवळे ही आद्य काव्यरचना आहे. हे एक कथाकाव्य आहे.

एकदा श्रीगोविंदप्रभूना विवाह करण्याची प्रवृत्ती झाली. बाशिंग बांधून हळद लावल्यावर श्रीगोविंदप्रभु महदाइसेस म्हणाले, आवो मेली जाय: गाए गाय म्हणे. महदाईसा म्हणितले 'आवो कृष्ण रुक्मिणी गाय म्हणे: तुरवा थाट गाय म्हणे' आणि त्यानंतर महदाईसेस स्फूर्ती झाली.यातून मराठीतले पहिले काव्य जन्मास आले. ८४ ओव्यांचे धवळे महदंबेने गाईले. धवळ्याच्या पूर्वाधाची रचना श्रीगोविंदप्रभूच्या हयातीत म्हणजे इ.स. १२८७—८८ च्या पूर्वी झाली. उत्तरार्ध नंतरचा आहे. धवळे म्हणजे लग्नप्रसंगी गावयाची वर विषयक गाणी, लोकगीते आहेत. त्यांची भाषा साधी आहे. महदंबेने श्रीचक्रधरांकडून श्रीकृष्ण लीळा ऐकल्या व धवळयांमधून गायील्या. धवळयाचा उत्तरार्ध पूर्वाधानंतरचा वर्षानंतरचा आहे. धवळयाचा उत्तरार्ध

लिहिण्यासाठी लक्ष्मींद्रभट व म्हाइंभट यांचा हातभार लागला. श्रीगोविंदप्रभूपासून महदंबेस स्फूर्ती झाली व ती उत्स्फूर्तपणे तुरीया रागात गाऊ लागली. चार दिवस श्रीगोविंदप्रभूनी रुक्मीणी स्वयंवर आइकिले. महदंबा ही मोठी बुध्दिमान,अतिविरक्त आणि परमार्ग मर्म जाणणारी होती या कवयित्रीमुळेच महानुभाव वाङ्मयात ओवी वाङ्मयाला स्थान मिळाले. महदाईसेच्या नावावर धवळे, मातृकीरुक्मिणी स्वयंवर आणि गर्भकांड ओव्या एवढी रचना आहे

## नागांबा —

महानुभाव पंथाचे द्वितीय आचार्य बाईदेवबास त्यानंतरचे आचार्य कवीश्वरबास यांचे वडीलबंधू दिवाकर यांची नागांबा ही कन्या होती. तिने कवीश्वरांकडे दीक्षाविधी स्वीकारला आणि अखंड आचार्याच्या सान्निध्यात राहिली. शिवाय भटोबासांकडून नागांबिकेला बोधही झाला होता. ही सकल शास्त्र जाणत असल्यामुळे पंडिता स्त्री म्हणून तिचा उल्लेख केला जातो.

कवीश्वराच्या मृत्युनंतर नागांबा दुःखाने व्याकुळ झाली. त्यावेळी तिने ज्या ओव्या गायिल्या त्या वियोग ओव्या म्हणून प्रसिध्द आहे. नागांबिकेच्या  कडव्यांच्या या ओव्यांतून तिची विरही अवस्था व्यक्त झाली आहे. गुरुनिष्ठा आहे. गुरुला आपण अंतरलो ही असहनीय जाणीव आहे.

## इतर साहित्यिक स्त्रिया —

## धनाइसा —

सतराव्या शतकात 'हंसाबा स्वयंवर' काव्य लिहिले गेलेले असून ते श्री चक्रधरांच्या हंसाबिकेशी झालेल्या वरंगळ येथील विवाहासंबंधी आहे. महानुभाव पंथाच्या इतिहासात दोन धनाइसा आढळतात. उपाध्ये आम्नायातील एक मयंकराजाची गुरुबहीण तर दुसरी सारंगधरांची शिष्या आहे. यापैकी एकीने हे काव्य लिहील आहे. हे काव्य श्रीचक्रधरांच्या हंसाबिकेशी झालेल्या विवाहासंबंधी असून  ओव्यांमध्ये गुंफलेले आहे. लीळाचरित्रात नसलेला पण या कवयित्रीन आपल्या कल्पनेने सजविलेला भाग त्यात पुष्कळ आहे. हे काव्य गेय आहे. या काव्याची भाषाशैली समृध्द आहे.

## महदाइसेने गायीलेल्या ओव्या —

ओवी हा प्राचीन मराठी कवितेचा अविभाज्य घटक आहे. स्त्री रचित मौखिक ओव्या हे ओवीचे मूळ रुप होय. ओवी म्हणजे ओवणे. भावभावना ओवणे ओवी साधी, भोळी, सहज सुंदर, सोपी, बोलीभाषेतून रचलेली असते. त्यामुळे ती लवचिक अर्थवाही व जिवंत आहे. दळणकांडण करतांना स्त्रिया ओवी गीते गातात. ओवी म्हणजे स्त्रीची सखी.

महदंबेने दळणकांडण करतांना आपल्या आराध्य दैवताविषयीचे भाव विविध प्रतिमातून व्यक्त केले आहे. महदंबेची ओवी ही वारकरी संतांच्या पूर्वीची आहे.

## महदंबा शोकवर्णन

श्री चक्रधरांचा वियोग सहन न झाल्यामुळे श्री नागदेवाचार्य निघून गेले. कोणालाही त्यांचा शोध लागला नाही. महदाईसाने त्यांचा शोध घेतला. श्री गोविंदप्रभूच्या सांगण्यावरुन महदंबेने नागदेवाचार्यांना पाठकुळी घेउन रिध्दपूरी आणले. वास्तवात श्रीचक्रधरांच्या विरहाने ती पोरकी झाली होती. पण अतीव दुःखाचा कढ आवरुन धैर्य खचू न देता निणर्यक्षमता व चिकाटीच्या बळावर तिने नागदेवास रिध्दपूरी आणले.

'महदंबा शोकवर्णन' हे महदंबेच्या शोक विव्हळ अवस्थेचे मूर्तिमंत दर्शन आहे. कारुण्य आणि भक्ती यांचा मनोहर संगम या गीतात आढळते. सुटसुटीत, साधी, सरळ, ओघवती भाषाशैली हे या गीताचे वैशिष्टय आहे. करुणा व भक्तिरसाने ओथंबलेले हे काव्य आहे. एका अनामिक कवी–कवयित्रीने आपल्या प्रतिभेच्या बळावर हे गीत रचले. .

'मातृकी रुक्मिणी स्वयंवर' ही धवळ रचनेपेक्षा वेगळ्या प्रकारची रचना आहे. यामध्ये ११० पदे असून ही ओवीबध्द रचना आहे. यामध्ये बावन्न मातृका प्रत्येक ओवीचा प्रारंभ एक याप्रमाणे योजल्या आहेत. हे काव्य ११० ओव्यांचे आहे. १ ते ८२ ओव्यांमध्ये क ते क्ष पर्यंत अक्षरे आहेत. ३ ते १०१ ओव्यांत अ पासून उ पर्यंत अक्षरे घेतलेली आहेत. त्यानंतर भ—ट—म—च—द—व—म—न—य असा अक्षरक्रम आहे.

महदाईसेची काव्यरचना ही विविध प्रकारची आहे. महदंबेनी गर्भकांड ओव्या तसेच आरत्या रचल्या आहेत.

### देमाइसा —

देमाईसाच्या गीतात आर्तता आहे. प्रभूशिवाय राहण्याची कल्पना असहनीय आहे. तिच्या मनातील भावोत्कटता, आर्त स्पंदने काव्याच्या रुपाने प्रतीत झाली आहे.

### नात नागाइसा —

नात नागाइसा हिने 'सहयाद्रीचा तोडा ही रचना केली. ही नागदेवाचार्यांची नात असून ती मोठी तपस्वी व ब्रम्हविद्येत पारंगत होती. तोडा हा गद्य लेखन प्रकार असून यात लेखकाने मत विविध प्रमाणांच्या आधारे नोंदविलेले असते. माहूर हे स्थान स्वाभिमानी देवतेचे असल्यामुळे साधकाला त्या देवतेपासून विघ्न होण्याचा संभव असतो.

यात सहयाद्रीचा परिसर, ब्रम्हगीरीचे पठार,ब्रम्हगीरीचा उतरणीचा भाग हा श्रीदत्त चरणांकीत भाग म्हणून दर्शविला आहे. ही विद्वान, वादविवादपटू, चर्चक होती.

### उमाइसा —

श्री नागदेवाचार्यांची ही धाकटी बहीण. एकदा उमाइसा हळूहळू गात होती. तेव्हा स्वामींनी विचारले बाई: मासउपवासिये गातातिʼ तेव्हा स्वामींच्या सांगण्यावरुन तीने चौपदी गायिली. उमाइसेने गायिलेली हिन्दी काव्यरचना हे हिन्दीतील प्रथम काव्य होय.

परमेश्वराशिवाय जीवन निरर्थक असल्याचे ती काव्यातून व्यक्त करते. श्री चक्रधरांनी देखिल हिन्दी मिश्रित गुजराथी रचना याप्रसंगी गायिली.

### नाइकबाई —

नाइकबाईने अप्राप्तीरुप गीतरचना केली आहे. परमेश्वर न मिळाल्याने एका विरहिणीची अवस्था काय होते हा भक्तिभाव काव्यात व्यक्त केला आहे.

### रुक्माउसा —

श्रीकृष्ण स्वरुप, गुण इत्यादीवर हे काव्य रचले आहे. ५ कडव्याचे हे काव्य अतिशय सकस आहे. ईश्वराचे मी रुक्मिणी दासी मनात चिंतन करत आहे. असा आशय या काव्यात आहे.

### साकाबाई —

मुलाला गोविंद आवडत नाही. यामुळे कवयित्री व्यथित होते. दगडाने माझ्या कुशीत जन्म घेतला. जन्म देऊन ही मी वांझच राहिले याचे शल्य तिला आहे.

### पोमाइसा—

पोमाइसाच्या नावावर ही गर्भकांड ओव्या आहेत.

**कमळाराणी विरहपद —**

या काव्यामध्ये हरिपाळ देवांनी घराचा त्याग केल्यानेतरची कमळाऊसाची अवस्था व तिने व्यक्त केलेल्या पश्चातापाचे वर्णन यात कवीने केलेले आहे.

**नागांबिका स्तवन —**

नागांबिकेला प्रेमदान मिळाले म्हणून अनेक कवींनी स्तवने गायिली.

**शांताबाईसाच्या योग्यतेविषयीच्या ओव्या —**

राघव मुनीने हे काव्य रचले आहे. या काव्यात कवीने शांताबाईसेच्या पूर्व वृत्ताचे व श्रीचक्रधरांच्या सान्निध्यामध्ये मिळालेल्या मानसिक शांतीचे वर्णन केले आहे.

**हिराइसेची कवित्व शक्ती —**

या काव्याचा कर्ता खळो हा आहे.

**स्त्रियांची गद्यपद्य रचना —**

भाष्यग्रंथांना प्रारंभ लहानसहान प्रमेयांनी केला आहे. प्रमेय म्हणजे तत्व किंवा सिध्दांत एखादे प्रमेय सूत्रपाठातून निवडून त्यावर केलेले गद्यभाष्य म्हणजे महानुभावांचा प्रमेयग्रंथ होय. नागाइसा हिच्या दुर्भाग्यप्रमेयाची रचना उपलब्ध नाही. नोंदमात्र आहे.

**नागाइसा —**

नागाइसा ही भास्कराची पुतणी हिच्या नावावर चार प्रमेय रचना आहे.

**पदे आणि ध्रुवे —**

महानुभाव पंथात स्त्रियांनी रचलेली गीते काळाच्या ओघात नष्ट झाली किंवा पंथापूरती मर्यादित राहली असणार त्याचे संशोधन होऊन संग्रह प्रसिध्द होऊ शकले नाही.

**निष्कर्ष —**

यादवकाळात श्री गोविंदप्रभू एका विधवा स्त्री कडून विवाहगीत गाऊन घेतात. येथे त्यांचा पूरोगामी दृष्टिकोन दिसतो. धवळे हे यादवकाळाचे रंगचित्र आहे. पद्यवाङ्मयाचा प्रारंभ महानुभाव कवयित्रीने केला. उमाइसेने गायिलेली रचना ही हिन्दीतील प्रथम रचना आहे. अनेक स्त्रियांनी तत्त्वज्ञानावर आधारित गद्यपद्य रचना केल्या आहे. काही पुरुषांनी स्त्रियांची विद्वता व अधिकार जाणून स्त्रियांवर गीते लिहिलेली आहेत. प्रारंभ काळातच यांनी रचना रचल्या असून त्या सरस आहे. या रचनांमध्ये कवीत्ववृत्ती, प्रतिभाशैली, सहजता, प्रासादिकता,उत्कृष्टता ओतप्रोत भरलेली आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**


१) डॉ. सौ. इलेकर सुहासिनी (संपा.): महदंबेचे धवळे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे
२) मंचरकर रत्नाकर बापुराव : धर्मसंप्रदाय आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय, प्रतिमा प्रकाशन,सदाशिव पेठ,पुणे
३) तुळपुळे शं.गो. : महानुभाव पंथ आणि त्यांचे वाङ्मय,व्हीनस प्रकाशन,पुणे.
४) नसिराबादकर ल.रा.: प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर
५) डॉ. देशपांडे अ.ना. : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (भाग तिसरा), व्हीनस प्रकाशन, पुणे.
६) डॉ. सौ.इलेकर सुहासिनी: प्राचीन मराठी कवयित्रींचे वाङ्मयीन कार्य, परिमल प्रकाशन, औरंगाबाद.
७) डॉ. धाबे सुशीला : लीळाचरित्रातील स्त्री दर्शन, सुगम प्रकाशन, अमरावती.
८) शेवाळकर अनिल (संपा.) : महानुभावआद्य साहित्य: एक चळवळ, दिलीपराज प्रकाशन, पुणे.